ISSN : 2393-8900
IMPACT FACTOR : 1.9152 (UIF)

# Historicity

## International Research Journal

UGC APPROVED
Journal No. 62782


VOLUME-IV FEB.2018

**SPECIAL ISSUE**

### Theme

Feminist and Gender Studies in a Global Perspective with Interdisciplinary Approach





| | | | |
|---|---|---|---|
| 74 | अहिल्याबाई होळकर यांचे क्रांतीकारी कार्य | - प्रा. सरला चव्हाण | 263 |
| 75 | स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग : एक अभ्यास | - प्रा. के.टी. व्हनहुवे | 266 |
| 76 | आधुनिक भारताच्या निर्मितीतील कणखर नेतृत्व - इंदिरा गांधी | - डॉ.चंद्रकांत चव्हाण | 268 |
| 77 | Ezhava Social Reform Movement in Kerala: Women's Education and the Question of Community | - Dr. Sreebitha P V | 270 |
| 78 | हैद्राबाद मुक्तीसंग्रामात मराठवाड्यातील स्त्रियांचे योगदान | - प्रा. विकास विलासराव शिंदे | 275 |
| 79 | भारतातील कामकरी स्त्रियांच्या समस्या | - प्रा. रामेश्वर एम. मोरे | 278 |

# स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग : एक अभ्यास

प्रा. के.टी. व्हनहुवे
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
तालुका : बार्शी, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र

**सारांश :**

स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग वाढला तर, महिलांचा विकास होऊन महिलामधील राजकारणा वि यी अभिरुची वाढल्यास मदत होते, महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविल्यास, महिला सक्षमीकरण होऊन लोकशाही आणखी बळकट होण्यास मदत होईल.

**प्रास्ताविक :**

तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ७३ वी घटनादुरुस्ती करुन स्थानिक राजकीय निर्णय प्रक्रियेत समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधीत्व देण्यासाठी व महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेत आरक्षणाची तरतुद करण्यात आली. त्यानुसार महिलांना ३३% आरक्षण देण्यात आले. पुढे २००९ साली केंद्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५०% आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या निर्णयाचा अंमलबजावणी करत महारा ट्र सरकार देखील २०११ साली महिलांना पंचायत राज व्यवस्थेमध्ये ५०% आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्या निर्णयामुळे जिल्हा परि ादेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती,सरपंच व सदस्य आदी पदांवर काम करण्याची संधी महिलांना मिळाली.

**कार्यात्मक व्याख्या :**

दक्षिण सोलापूर : सोलापूर जिल्हयातील ११ तालुक्यापैकी १ तालुका.

राजकीय सहभाग : स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सदस्यत्व अथवा पद उपभोगलेले सदस्य अथवा पदाधिकारी महिला.

**संशोधनाची गरज व महत्व :**

सदर संशोधनामुळे तालुक्यातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय दर्जा व राजकीय सहभाग यांचा अभ्यास होणार आहे. तसेच पुरु ा व महिला यांच्या राजकीय सहभागाच्या अभ्यासाची तुलना होणार आहे. सदर संशोधन विद्यार्थी, शिक्षक, समाज यांना उपयुक्त व मार्गदर्शक ठरणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. दक्षिण सोलापूर तालुक्यातील महिलांचा राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.
२. पुरुष व स्त्री यांच्या राजकीय सहभागाची तुलना करणे.
३. महिलांमधील राजकीय उदासिनतेची कारणे शोधणे.
४. सामाजिक दर्जा शोधणे.
५. निवडणूक प्रक्रियेतील भूमिका अभ्यासणे.

**गृहितक :**

१. दक्षिण सोलापूर तालुक्यातील महिलांचा राजकीय सहभाग उल्लेखनीय आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

१. प्रस्तुत संशोधन दक्षिण सोलापूर तालुक्यापुरतेच मर्यादित आहे.
२. सदर संशोधन सध्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील सहभागापुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन साधने :**

१. मुलाखती
२. वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्तांक व लेख
३. निरिक्षण
४. संदर्भ पुस्तके

**निष्कर्ष :**

१. सदर सदस्यांमध्ये ओ.बी.सी., एस.सी., सर्वसाधारण प्रवर्गातील सगळया महिलांचे समावेश आहे.
२. सदर महिला विविध राजकीय पक्ष व पार्श्वभूमीतून निवडून आल्याचे दिसून येते.
३. सदर महिला अनुक्रमे ४१ महिला सरपंच, ०६ महिला पंचायत समितीचे सदस्य आणि जिल्हा परि ादेचे ०३ सदस्य या आरक्षित मतदार संघातून निवडणूक लढविले आहेत. म्हणजेच ५०% आरक्षणाचा त्यांना फायदा मिळालेला आहे.
४. ग्रामपंचायतीमधील पं.स. जि.प. स्त्री सदस्यांमध्ये सकारात्मक बाबी दिसून आल्या.
५. निर्णय क्षमता, आर्थिक साक्षरता, राजकीय जागृती या विषयी समिश्र प्रतिसाद मिळाला.

ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)

६. स्त्रियांच्या तुलनेने पुरुषवर्ग अनुभवी असल्यामुळे त्या त्या सभागृहात निर्णय प्रक्रियेत पुरुषांचा प्रभाव दिसून येतो.
७. वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर पुन्हा एकदा काम करण्याची संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे स्त्रियांच्या विकासाला मर्यादा येतात.
८. प्रस्तुत अभ्यासामध्ये असे दिसून आले की, २ टर्म आरक्षणाची मागणी अनेक स्रीयांकडून केली गेली. जेणेकरुन स्त्रियांना खऱ्या अर्थाने राजकीय निर्णय प्रक्रियेत सक्षम प्रतिनिधी म्हणून सहभाग घेता यावा.
९. प्रशासन आणि राजकारणातल्या अनुभवांमुळे स्त्रियामधील आत्मविश्वास वाढला आहे.
१०. काही ठिकाणी स्त्रियांच्या राजकीय सहभाग आणि निर्णय प्रक्रियेत घरातील पु ा मंडळीचा हस्तक्षेप किंवा प्रभाव असल्याचा दिसून येतो.
११. राजकीय पक्ष संघटना आणि त्यांच्या महिला आघाडीच्या माध्यमातून स्त्रियांचा राजकीय सहभाग उल्लेखनीय आहे.
१२. बचत गट, महिला मंडळ, विविध पक्षीय महिला आघाडीतून काम करताना, त्यांच्यात आत्मविश्वास आल्यामुळे स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढत आहे.
१३. काही महिला या अल्पशिक्षण किंवा शिक्षणाचा अभाव आणि आर्थिक, सामाजिक मागासलेपणामुळे त्यांच्यात आणखी सक्षमीकरणाची गरज आहे. जेणे करुन त्यांच्या क्षमतेत वाढ होईल.
१४. पक्षीय राजकारणामुळे महिलांच्या राजकारणाला विविध विचारांची अधि ठान असल्याचे दिसून आले.

**शिफारशी :**

१. महिलांमध्ये राजकीय सहभागावि ायी जागृती निर्माण करण्याचे काम राजकीय पक्षाकडून व्हावे.
२. पदाधिकाऱ्यांना देण्यात येणारा मानधन अत्यल्प आहे. मानधनात भरीव वाढ केल्यास महिलांना राजकारणात सहभाग करुन घेण्यास मदत होईल.
३. स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविणेसाठी शाळा, महाविद्यालये व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांनी उद्‌बोधन करावे.
४. सभा, संमेलने व परि ादेच्या माध्यमातून स्त्रियांचा सहभाग वाढवून स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. एस.जी. देवगावंकर-राजकीय समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन-२०१३
२. डॉ. सुनिता सरवदे-राजकीय समाजशास्त्र,सनराईज प्रकाशन
३. डॉ.सुनिल मायी- सामाजिक संशोधन पध्दती,डायमंड प्रकाशन-२००८